महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :- २२५१/सआऔ/२०२२/१५(गोप-१)** **दिनांक :-** २२ डिसेंबर, २०२२

# -: घोषणा :-

सहायक आयुक्त (औषधे), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गट-अ (जाहिरात क्रमांक २०/२०२२) या पदाच्या जाहिराती मध्ये नमूद शैक्षणिक अर्हतेच्या संदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ६७७/२०२२ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक ६२९/२०२२ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाकडून दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेला सदर पदाचा अभ्यासक्रम मागे घेण्याबाबतची घोषणा दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी करण्यात आली होती.

तथापि उपरोक्त न्यायालयीन प्रकरणी दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी मा. न्यायाधिकरणाने शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल करुन भरती प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशानुसार, सहायक आयुक्त (औषधे), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गट-अ पदाचा अभ्यासक्रम मागे घेण्याबाबतची दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजीची घोषणा, या घोषणेद्वारे रद्द करण्यात येत असून सहायक आयुक्त (औषधे), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गट-अ (जाहिरात क्रमांक २०/२०२२) या पदाकरीता दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला अभ्यासक्रम अंतिमत: लागू राहील.

**परीक्षा नियंत्रक व सह सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**ठिकाण: मुंबई**